आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२९ जून २०२५ - रविवार

**ठळक बातम्या**

- लोक-सहभागाच्या बळावर मोठमोठ्या संकटांचा सामना करता येऊ शकतो हे आणीबाणीच्या काळानं दाखवून दिल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधे प्रतिपादन / पर्यावरण रक्षणाच्या प्रयत्नांची दिली माहिती.

- राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन उद्यापासून मुंबईत सुरु होणार, सरकारच्या चहापानावर विरोधकांचा बहिष्कार, विविध मुद्द्यांवर राज्य सरकार पूर्णपणे अपयशी ठरल्याचा विरोधकांचा आरोप

- मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पुन्हा आक्रमक, येत्या २९ ऑगस्टला मुंबईत मंत्रालयावर मोर्चा काढण्याची घोषणा

- अमेरिकन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत महिला गटात तन्वी शर्मा आणि पुरुष गटात आयुष शेट्टी यांच्या आज विजेतेपदांसाठी लढती

**आणि**

- त्रिभाषा सूत्रासंदर्भात डॉ. नरेंद्र जाधव यांच्या नेतृत्वात समिती स्थापन करण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची घोषणा / दोन्ही जीआर रद्द

**<><><><><>**

लोक-सहभागाच्या बळावर मोठमोठ्या संकटांचा सामना करता येऊ शकतो हे आणीबाणीच्या काळानं दाखवून दिल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमाच्या एकशे तेविसाव्या भागात बोलत होते. आणीबाणी लादण्याच्या घटनेला पन्नास वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त, देशात संविधान हत्या दिवस पाळला गेला त्याबद्दल ते बोलत होते. यासंदर्भात मोरारजी देसाई आणि अटल बिहारी वाजपेयी या माजी प्रधानमंत्र्यांनी आणीबाणीच्या

निषेधात केलेल्या भाषणांचा अंशही त्यांनी श्रोत्यांना ऐकवला. आणीबाणीच्या काळात अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करत, समाजातल्या प्रत्येक घटकाला त्रास दिला गेला. मात्र भारताच्या जनतेनं न झुकता आपलं सामर्थ्य दाखवलं, आणीबाणी हटली आणि आणीबाणी लादणारे पराभूत झाले असं ते म्हणाले.

नुकत्याच झालेल्या जागतिक पर्यावरण दिनाविषयी बोलताना त्यांनी देशभरात केल्या जात असलेल्या अनुकरणीय प्रयत्नांचा उल्लेख केला. पुण्याचे रमेश खरमाळे वन संवर्धनासाठी करत असलेल्या कार्याची माहिती त्यांनी श्रोत्यांना दिली. मन की बात मधे आपल्या कार्याचा उल्लेख झाल्याबद्दल रमेश खरमाळे यांनी आकाशवाणीकडे आपल्या भावना व्यक्त केल्या.

**होल्ड बाईट - रमेश खरमाळे**

छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातल्या पाटोदा ग्रामपंचायतीनं सामूहिक प्रयत्नातून कार्बन तटस्थता गाठल्याची माहिती प्रधानमंत्र्यांनी दिली. लहानसहान सवयींमधून जेव्हा सामूहिक निर्धार उभा राहतो तेव्हा निश्चितपणे फार मोठं परिवर्तन घडून येतं असं ते म्हणाले. एक पेड, माँ के नाम  या अभियानात सहभागी होण्याचं आवाहन त्यांनी केलं.

जागतिक आरोग्य संघटनेनं भारत हा ट्रॅकोमा या डोळ्यांच्या आजारापासून मुक्त झाल्याची घोषणा केली असल्याची माहिती त्यांनी दिली.

आरोग्यापासून ते सामाजिक सुरक्षेपर्यंत प्रत्येक क्षेत्रात देश परिपूर्णतेच्या भावनेनं पुढं जात असल्याचं ते म्हणाले. देशातल्या ६४ टक्क्यापेक्षा जास्त जनतेला आता सामाजिक सुरक्षाविषयक योजनांचा लाभ मिळत असल्याचं आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या अलिकडच्या अहवालात म्हटलं आहे. २०१५ पर्यंत सामाजिक सुरक्षा योजनांचे लाभार्थी २५ कोटींपेक्षा कमी होते. ते आता ९५ कोटी झाले आहेत, असं त्यांनी सांगितलं.

महिलांच्या नेतृत्वाखाली विकास या मंत्राच्या आधारे भारत आपलं नवं भविष्य उभारत असल्याचं ते म्हणाले. यानिमित्तानं त्यांनी देशभरातली महिला उद्योजकतेची प्रेरणादायी उदाहरणं श्रोत्यांसमोर मांडली.

**होल्ड बाईट - MKB WOMAN LED DEVLOPMENT**

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन उद्यापासून मुंबईत सुरु होत आहे. येत्या १८ जुलैपर्यंत हे अधिवेशन चालणार आहे. अधिवेशनच्या पूर्वसंध्येला आज सरकारनं आयोजित केलेल्या चहापानाच्या कार्यक्रमावर विरोधी महाविकास आघाडीनं बहिष्कार टाकला. भ्रष्टाचार, मराठीवर अन्याय, हिंदीची सक्ती, शक्तिपीठ महामार्गाला विरोध इत्यादी मुद्द्यांवर राज्य सरकार पूर्णपणे अपयशी ठरलं असल्याची टीका महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केली. आघाडीच्या घटक पक्षांची बैठक आज मुंबईत झाली, त्यानंतर विधानपरिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, काँग्रेसचे विजय वडेट्टीवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आदित्य ठाकरे, राष्ट्रवादी शरद्चंद्र पवार पक्षाचे जितेंद्र आव्हाड यांच्यासह इतर नेत्यांनी वार्ताहर परिषद घेतली. राज्यात कायदा-सुव्यवस्था राखण्यात सरकार पूर्णपणे अपयशी ठरल्याची टीका अंबादास दानवे यांनी केली. हे सर्व मुद्दे विधिमंडळात उपस्थित करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. राज्यातली वाढती गुन्हेगारी, भ्रष्टाचाराच्या आरोपांवर मुख्यमंत्री का गप्प आहेत, युतीधर्मामुळे त्यांनी मौन बाळगलं आहे का, असा प्रश्न आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला. विजय वडेट्टीवार यांनी शेतकऱ्यांची कर्जमाफी, बेरोजगारी या मुद्द्यांवरून सरकारला लक्ष्य केलं, तर मतांच्या राजकारणासाठी मराठी माणसाचा, मराठी भाषेचा बळी सरकार देत असल्याची टीका जितेंद्र आव्हाड यांनी केली. अशा सरकारसोबत चहापानाला जाणं योग्य नाही, त्यामुळे चहापानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय महाविकास आघाडीनं घेतल्याचा पुनरुच्चार या नेत्यांनी केला.

**<><><><><>**

राज्यात इयत्ता पहिलीपासून हिंदी विषय शिकवण्यासंदर्भातल्या शासन निर्णयाच्या निषेधार्थ आज राज्यभरात विविध ठिकाणी विविध पक्षसंघटनांनी या शासन निर्णयाची होळी केली. त्रिभाषा सूत्र राज्यात लागू न करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, मनसे, काँग्रेस, माकप, भाकप, वंचित बहुजन आघाडी या पक्षांसह अनेक संस्था सहभागी झाल्या होत्या.

नाशिकमधल्या शालीमार चौकात आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं हिंदी सक्तीला विरोध करत जोरदार घोषणाबाजी केली. बीड, हिंगोली, भंडारा इथंही शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं शासनादेशाची होळी केली.

**<><><><><>**

मराठा आरक्षणासाठी येत्या २९ ऑगस्टला मुंबईत मंत्रालयावर मोर्चा काढण्याची घोषणा मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी केली आहे. त्यांनी आज जालना जिल्ह्यात अंतरवाली सराटी इथं मराठा समाजबांधवांची राज्यव्यापी बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी ही घोषणा केली. आता आपल्याला रणभूमीत उतरून मैदान गाजवायचं असून, विजय खेचून आणायचा आहे. आता ही आरपारची लढाई असून, मागण्या मान्य झाल्याशिवाय मुंबईतून माघारी फिरायचे नाही, असं ते म्हणाले.

येत्या २७ ऑगस्टला आंतरवली सराटीतून निघून दोन दिवसांत मुंबईत पोहोचण्याचा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला. नियोजित मोर्चाचा मार्ग आणि इतर विषयांवर यावेळी चर्चा झाली. या राज्यव्यापी बैठकीला राज्यभरातून मोठ्या संख्येनं लोक उपस्थित होते.

**<><><><><>**

अमेरिकन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष गटात आयुष शेट्टीनं जागतिक मानांकनात सहाव्या क्रमांकावरचा चोऊ तिएनचेन याला २१-२३, २१-१५, २१-१४ असं हरवून अंतिम फेरी गाठली आहे. विजेतेपदासाठी आज रात्री त्याची लढत तृतीय मानांकित कॅनेडियन खेळाडू ब्रायन यांगशी होणार आहे..

महिला एकेरीत तन्वी शर्माने उपान्त्य फेरीत काल युक्रेनच्या पोलिना बुरहोवाचा २१-१४, २१-१६ असा पराभव केला. आता तिचा सामना चीनच्या बेईवेन झांग बरोबर होणार आहे. सामना भारतीय प्रमाण वेळेनुसार आज रात्री साडेआठ वाजता सुरू होईल.

<><><><><>

शालेय शिक्षणात तिसरी भाषा कधीपासून शिकवावी, ती कोणती असावी, कशी शिकवली जावी, यासंदर्भात शिफारशी करण्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या नेतृत्वात समिती स्थापन करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली. राज्य विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित चहापानानंतर ते वार्ताहर परिषदेत बोलत होते. यासंदर्भात काढलेले दोन्ही शासन निर्णय रद्द करत असल्याचंही फडणवीस यांनी जाहीर केलं.

//<><><><><>//